आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६

ठळक बातम्या

1. एम्स नागपूर ठरलं पूर्ण NABH (एनएबीएच) मानांकन मिळवणारं महाराष्ट्रातील पहिलं सार्वजनिक रुग्णालय.
2. महाशिवरात्री निमित्त विदर्भातल्या शिवमंदिरांमध्ये अलोट गर्दी; अनेक ठिकाणी यात्रांचं आयोजन.
3. दहशतवाद विरोधी पथकाचे यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापे.
4. वाशीमच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालय-महाविद्यालयाला संत सेवालाल महाराज यांचं नाव.

लोकसभा

लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर ९ मार्चला पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेतलं जाईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी वृत्तसंस्थेला दिली.अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चला सुरू होईल. या टप्प्यात काही महत्त्वाची विधेयकं चर्चेला येतील, असं त्यांनी सांगितलं

एम्स नागपूर

एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नागपूर यांना भारतीय गुणवत्ता परिषद अंतर्गत 'रुग्णालयं आणि आरोग्यसेवा प्रदाते' यांच्यासाठी एनएबीएच अर्थात राष्ट्रीय मानांकन मंडळाकडून पूर्ण मानांकन प्रदान करण्यात आलं आहे. संस्थात्मक गुणवत्ता हमीच्या दृष्टीनं हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या मान्यतेमुळे एम्स नागपूर हे महाराष्ट्रातील पूर्ण एनएबीएच मानांकन मिळवणारं पहिलं सार्वजनिक रुग्णालय ठरलं आहे. या मानांकनात देशातील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये सर्वाधिक व्यापक उपचार सेवा समाविष्ट आहेत.सक्षम गुणवत्ता प्रणाली निर्माण करणं आणि सुरक्षित, रुग्णकेंद्री आरोग्यसेवा सुनिश्चित करणं यासाठी सर्वांनी केलेल्या प्रयत्नांचं हे प्रतीक असल्याचं प्रतिपादन संस्थेचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रशांत जोशी यांनी केलं. या यशामुळे सार्वजनिक क्षेत्रातील

तृतीयक आरोग्यसेवा केंद्र म्हणून संस्थेची प्रतिमा अधिक बळकट झाली असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<u>महाशिवरात्री समग्र</u>

महाशिवरात्रीचा उत्सव आज सर्वत्र भक्तिभावानं साजरा होत आहे. देशातल्या बारा ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणांसह प्रमुख पुरातन शिव मंदिरांत पहाटेपासूनच रुद्राभिषेक-महापूजा करण्यात येत असून भाविक मोठ्या संख्येनं दर्शनासाठी गर्दी करत आहेत.महाशिवरात्री निमित्त नागपुरातील महाल इथल्या कल्याणेश्वर मंदिर तसंच पाताळेश्वर इथं दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची रांग दिसत आहे. मंदिरातील गर्भगृह देखील फुलांनी आकर्षक रीतीनं सजविण्यात आलं आहे. नंदनवन परिसरातील ५१ फूट उंचीच्या भगवान शंकराच्या मूर्तीचं दर्शन घेण्यासाठी, तसंच ऐतिहासिक बाहुली विहीर पाहण्यासाठी या परिसरात झालेल्या गर्दीमुळे जत्रेचं स्वरूप आलं आहे. गोंदिया शहरापासून 5 किलोमीटर अंतरावर असलेलं नागरा इथलं प्राचीन पंचमुखी शिव मंदिर हे २७० वर्ष जुनं आहे. या मंदिरात असलेल्या शंकराच्या पंचमुखी पिंडीचं दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रात्री १२ वाजल्यापासून मोठी गर्दी केली आहे. त्याचप्रमाणं अर्जुनी मोरगाव तालुक्यातील प्रतापगडावर महाशिवरात्री निमित्त भरणाऱ्या यात्रेत हिंदू मुस्लिम एकतेचं दर्शन पहायला मिळत आहे. प्रतापगड किल्ल्यावर एका बाजूला भगवान शंकराची भव्य मूर्ती आहे, तर दुसऱ्या बाजूला ख्वाजा उस्मान गनी हारूनी यांचा दर्गा असून दोन्ही समाजबांधव महाशिवरात्री निमित्त या किल्ल्यावर एकत्र येतात. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी आज शिवरात्रीनिमित्त या परिसराला भेट दिली. अकोला शहरातील शिवशंकर मंदिरामध्ये देखील भक्तिमय उत्साह दिसून येत आहे. शहराचं आराध्य दैवत राजेश्वर मंदिरात शिवलिंगाची आकर्षक सजावट करण्यात आली असून रुद्राभिषेक, भस्म आरती, जलाभिषेक तसंच सुकामेवा आणि हलव्यानं शिवलिंगाचा शृंगार केला आहे.महाशिवरात्री यात्रेनिमित्त भंडारा जिल्ह्यातील शिवभक्तांसाठी परिवहन विभाग सज्ज झाला असून एसटी महामंडळानं विशेष बससेवेचं नियोजन केलं आहे. येत्या १७ फेब्रुवारीपर्यंत गायमुख, प्रतापगड आणि आंभोरा या प्रमुख शिवतीर्थांसाठी १२९ ‘यात्रा स्पेशल’ बसेस सुरू करण्यात आल्या असून भाविकांच्या वाढत्या गर्दीचा विचार करून फेऱ्यांमध्येही वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, भंडारा जिल्ह्यातील छोटा महादेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या गायमुख या तीर्थक्षेत्री जात असताना रामपूर गावाजवळ ट्रॅक्टर पलटी होऊन सुमारे ६ भाविक जखमी झाले. त्यांना तुमसर इथल्या उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आहे.

मार्कंडेय

विदर्भाची काशी म्हणून ओळख असलेल्यागडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातल्या मार्कंडादेव इथं आजपासून महाशिवरात्रीनिमित्त यात्रेला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी लाखो भाविकांनी पहाटेपासूनच शिवलिंग आणि मार्कंडेश्वराच्या दर्शनासाठी रांगा लावल्याचे दिसून आले. या यात्रेत विदर्भासह शेजारच्या छत्तीसगड, मध्यप्रदेश, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातूनही हजारो भाविक दर्शनासाठी आले आहेत. यात्रेकरुंसाठी गडचिरोली व अहेरी आगारांसह नागपूर, चंद्रपूर आणि मूल येथूनही विशेष बसेस सोडण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे कुरखेडा तालुक्यातील अरततोंडी येथील हेमांडपंथी महादेव मंदिर परिसर, वैरागड, चपराळा या ठिकाणीही महाशिवरात्रीनिमित्त यात्रा भरली असून, भाविक दर्शन घेत आहेत.

देशव्यापी ए आई मोहीम

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर नैतिकता, सर्वसमावेशकता आणि जबाबदारीनं व्हावा, यासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय इंटेल इंडियासोबत मिळून उद्यापासून देशभरात मोहीम राबवणार आहे. विश्वासार्ह आणि मानवकेंद्रित एआय परिसंस्था तयार करणं, हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. उद्यापासून नवी दिल्लीत इंडिया एआय इम्पॅक्ट समिटला सुरुवात होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर या मोहिमेद्वारे नागरिकांशी संवाद साधला जात आहे.

छापेमारी

दहशतवादाशी संबंधित कारवायांप्रकरणी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं आज यवतमाळ आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापेमारी केली आणि काही संशयितांना ताब्यात घेतलं. यवतमाळमधल्या पुसद आणि उमरखेड इथल्या १४ ठिकाणी शोधमोहिमा सुरू आहेत. त्यात आक्षेपार्ह कागदपत्रं, मोबाईल फोन आणि विद्युत उपकरणं जप्त केल्याची, तसंच सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. संशयितांची चौकशी सुरू असून आतापर्यंत कोणालाही अटक केलेली नाही. अहिल्यानगर जिल्ह्यात ७ ठिकाणी दहशतवादविरोधी पथकानं छापे टाकले आणि आक्षेपार्ह वस्तू जप्त केल्या. ही कारवाई अद्याप सुरू असून मोठ्या संख्येनं पोलिस अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

सेवालाल महाराज जयंती

थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचं आराध्य दैवत, श्री संत सेवालाल महाराज यांची आज जयंती. राज्यभरात यानिमित्त विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई इथं त्यांच्या शासकीय निवासस्थानी सकाळी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.वाशीमच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालय-महाविद्यालयाचं नामकरण आता 'संत सेवालाल महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम' असं करण्यात आलं आहे. राज्य शासनानं याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी केला. शंभर विद्यार्थी क्षमतेसह संलग्न असं ४३० खाटांचं रुग्णालय सुरू करण्यासाठी याआधीच मान्यता मिळालेली आहे.

हर्षवर्धन सपकाळ

छत्रपती शिवाजी महाराज हे आपलं दैवत आहेत. महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणेतून संविधानाची निर्मिती झाली आहे. भाजपकडून आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज शिकण्याची गरज नाही. देश आणि राज्यात अनेक ज्वलंत मुद्दे असताना या मूळ मुद्यांना बगल देण्यासाठी भाजपकडून माझ्या वक्तव्याची मोडतोड करून वातावरण तापवलं जात असल्याची प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. टिपू सुलतानच्या मुद्द्यावर वर्धा इथं प्रसारमाध्यमांशी बोलताना महापुरुषांच्या नावावर राजकारण सुरू असून भाजप समाजात द्वेष पसरवत असल्याची टीका त्यांनी केली. दरम्यान, सपकाळ यांच्या विरुद्ध भाजपमार्फत अनेक ठिकाणी आंदोलनं करण्यात येत आहेत.

शिक्षण क्रमवारी

उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ज्ञांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हटलं आहे. या क्रमवारीत तमिळनाडू पहिल्या क्रमांकावर असून गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात समन्वय साधण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यं आत्मसात करता यावीत, यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ज्ञांची नेमणूक करण्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगानं २०२२ मध्ये मार्गदर्शक तत्त्वं जारी केली होती. ही नेमणूक तात्पुरत्या स्वरूपाची असेल, असंही यात सांगितलं होतं. त्यानुसार देशभरात अशा एक हजार ८४१ नेमणुका झाल्या असून यापैकी तामिळनाडूत ३४५, महाराष्ट्रात १९३, गुजरातमधे १७९ आणि कर्नाटकमधे १७० नेमणुका झाल्या आहेत.

## अनुवाद अकादमी

मराठी भाषेतली पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरीत केली. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या सत्कार सोहळयात काल ते बोलत होते. परदेशातल्या मराठी नागरिकांच्या पुढच्या पिढीसाठी मराठी शिकवणारा ऑनलाईन कोर्स, कवी केशवसुत स्मारकाचं अत्याधुनिकीकरण अशा घोषणाही सामंत यांनी केल्या.

## क्रिकेट

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात भारत-पाकिस्तान यांच्यातली लढत श्रीलंकेत कोलंबो इथं रंगणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी आपापले पहिले २ सामने जिंकून प्रत्येकी ४ गुण मिळवले आहेत. आजच्या लढतीतल्या यशापयशावर त्यांचं उपान्त्य फेरीतलं स्थान ठरेल.

## श्वेत क्रांती २.०

श्वेत क्रांती २.० अंतर्गत देशभरात सुमारे १ लाख २० हजार नवीन किंवा विद्यमान दुग्ध सहकारी संस्था, डीसीएस, बहुउद्देशीय दुग्ध सहकारी संस्था तसेच बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था यांची स्थापना आणि बळकटीकरण करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभराज्यासह अकोला जिल्ह्यातील दुग्ध उत्पादकांना मिळणार असून यामुळे ग्रामीण भागात दूध संकलनाची साखळी अधिक मजबूत होणार आहे.

*****